आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१० जून २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- नव्या केंद्रीय मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर/ राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी, निर्मला सीतारामन या वरिष्ठ मंत्र्यांची खाती कायम / कृषीमंत्रालय शिवराजसिंग चौहान यांच्याकडे, तर अश्विनी वैष्णव यांच्याकडे रेल्वेबरोबरच माहिती आणि प्रसारण मंत्रालय
- नव्या मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी अतिरिक्त घरं बांधण्याचा निर्णय
- शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार वचनबद्ध असल्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ग्वाही
- सिक्किमचे मुख्यमंत्री म्हणून प्रेम सिंग तमंग यांचा शपथविधी

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं ७७ हजाराचा टप्पा ओलांडला, मात्र दिवसअखेर २०३ अंकांची घसरण

**<><><><><>**

रालोआ सरकारच्या नव्या मंत्रिमंडळाचं खाते वाटप आज जाहीर झालं. यात राजनाथ सिंह यांना संरक्षण, अमित शहा यांना गृह, निर्मला सीतारामन अर्थ, नितीन गडकरी यांना रस्ते वाहतूक, पीयूष गोयल यांना वाणिज्य, एस. जयशंकर यांच्याकडे परराष्ट्र व्यवहार, ही आधीची खाती कायम ठेवली आहेत.

शिवराज सिंह चौहान यांना कृषी, जे पी नड्डा यांना आरोग्य, अश्विनी वैष्णव यांना रेल्वे, माहिती आणि प्रसारण, धर्मेंद्र प्रधान यांना शिक्षण, मनोहरलाल खट्टर यांना ऊर्जा, कुमारस्वामी यांना अवजड उद्योग, जितनराम मांझी यांना सूक्ष्म-लघु

आणि मध्यम उद्योग, लल्लन सिंह यांना पंचायत राज, चिराग पासवान यांना अन्न प्रक्रिया खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी अतिरिक्त घरं बांधण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नवी दिल्ली इथल्या निवासस्थानी आयोजित, नव्या मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधलेल्या घरांमध्ये शौचालयं, एलपीजी गॅस, वीज, पाणी यासारख्या सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कार्यभार स्वीकारला. हा पदभार तिसऱ्यांदा स्वीकारल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा १७ वा हप्ता जारी केला. या २० हजार कोटी रुपयांच्या निधीचा फायदा ९ कोटी ३० लाख शेतकऱ्यांना होणार आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी हे नवं सरकार वचनबद्ध आहे, अशी ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री कार्यालय हे नेहमी सेवा केंद्र आणि लोकांचं प्रधानमंत्री कार्यालय म्हणून बनवण्यासाठी आपण प्रयत्न केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज प्रधानमंत्री कार्यालयातल्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना संबोधित करताना ते बोलत होते. सरकारी कर्मचाऱ्यांच्या योगदानाचं यावेळी प्रधानमंत्र्यांनी कौतुक केलं.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात विविध देशांच्या नेत्यांची भेट घेतली.

मालदीवचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मोहम्मद मुइज्झू यांची भेट घेत राष्ट्रपतींनी मालदीवच्या जनतेला आणि नव्या सरकारला शुभेच्छा दिल्या. भविष्यात भारत आणि मालदीवमधले परस्पर संबंध आणखी दृढ होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मॉरिशिअसचे प्रधानमंत्री प्रविंद कुमार जगनौथ यांनीही राष्ट्रपतींची भेट घेतली. मॉरिशिअस हा हिंद महासागर क्षेत्रातला भारताचा महत्वाचा सागरी भागीदार असल्याचा पुनरुच्चार यावेळी राष्ट्रपतींनी केला.

नेपाळचे प्रधानमंत्री पुष्प कमल दहल प्रचंड यांनी आज राष्ट्रपतींची भेट घेतली. या भेटीत या नेत्यांनी दोन्ही राष्ट्रातल्या जनतेला फायदेशीर ठरणारे विकासात्मक उपक्रम पुढे नेण्याच्या मार्गांवर चर्चा केली.

सेशेल्सचे उपराष्ट्राध्यक्ष अहमद अफीफ यांनी राष्ट्रपती मुर्मू यांच्या बरोबर झालेल्या भेटीत, दोन्ही देशांचे दीर्घ काळापासून हिंद महासागर क्षेत्रातले संरक्षण सहकार्य वृद्धिंगत करण्यावर चर्चा केली.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एनडीए-राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अभिन्न भाग असल्याचा निर्वाळा, पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २५ वा वर्धापन दिन आज साजरा होत आहे. मुंबईत षण्मुखानंद सभागृहात झालेल्या मेळाव्यात बोलतांना अजित पवार यांनी केंद्रीय मंत्रीपदावरून काहीही नाराजी नसल्याचं स्पष्ट केलं.

दरम्यान, पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस भवनात राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत वर्धापन दिनाचा कार्यक्रम पार पडला. राष्ट्रपुरुषांच्या स्वाभिमानी विचारांवर आपण मार्गक्रमण करतांना, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी सांगितलेल्या ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या सूत्रानुसार आपण काम करत असल्याचं, पवार यांनी सांगितलं. अहमदनगर इथंही आज शरद पवार यांच्या उपस्थितीत मेळावा झाला.

**<><><><><>**

सिक्किमचे मुख्यमंत्री म्हणून प्रेम सिंग तमंग यांनी आज शपथ घेतली. त्यांच्यासह अकरा मंत्र्यांना राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी पद आणि गोपनियतेची शपथ दिली. सोनम लामा, अरुणकुमार उपरेती, समदुप लेपचा, भीम हांग लिम्बू, भोजराज राज, जी. टी. धुंगेल, पुरन कुमार गुरुंग, पिंट्सो नामग्याल लेपचा यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री प्रेम सिंग तमंग यांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी आज विक्रमी उंची गाठल्यानंतर दिवसअखेर घसरण नोंदवली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज कालच्या पेक्षा वर उघडला. तेजी वाढत गेल्यानं दिवसभरात त्यानं एकदा ७७ हजार ७९ अंकांची विक्रमी उंची गाठली. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २३ हजार ४१२ अंकांच्या नव्या उंचीवर पोचला होता. मात्र नंतर नफा कमावण्यासाठी गुंतवणुकदारांनी विक्रीचा सपाटा लावल्यानं ही तेजी ओसरली. दिवसअखेर सेन्सेक्समधे २०३ अंकांची

घसरण झाली आणि तो ७६ हजार ४९० अंकांवर बंद झाला. निफ्टीही ३१ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार २५९ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

इक्विटी म्युच्युअल फंडमध्ये मे महिन्यात ३४ हजार ६९७ कोटी रुपयांची वाढ झाल्याचं असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंडच्या आकडेवारीत म्हटलं आहे. मागच्या महिन्याच्या तुलनेत यात ८३ पूर्णांक ४२ शतांश टक्के वाढ झाली आहे. ओपन एंडेड इक्विटी फंडमधली आवक सगल ३९ महिन्यातही सकारात्मक राहिली.

**<><><><><>**

चक्रीवादळ आणि गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी केंद्रीय मंत्र्यांचं एक पथक आज मणिपूरमध्ये दाखल झालं. गारपिटीमुळे राज्यात घरं, वाहन आणि पिकांचंही नुकसान झालं आहे. पथकानं थौबलमध्ये विविध ठिकाणी नुकसानीची पाहणी केली. तसंच जिल्हा प्रशासनासोबत बैठक घेऊन यासंबंधी चर्चा केली.

**<><><><><>**

सौर वादळांदरम्यान आदित्य एल वन या उपग्रहामार्फत घेतलेली सूर्याची छायाचित्रं भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं प्रकाशित केली आहेत. गेल्या महिन्यात झालेल्या या अवकाशीय घटनेच्या प्रभावाची चित्रं या उपग्रहाने सुस्पष्टपणे टिपली आहेत. सूर्याच्या पृष्ठभागावरचे स्फोट,त्यांच्यातलं उर्जाउत्सर्जन आणि त्यामुळे प्रभावित चुंबकीय क्षेत्र या चित्रांमधे स्पष्ट पहायला मिळतं.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१० जून २०२४ - सोमवार

लैंगिक शोषण प्रकरणी माजी खासदार प्रज्वल रेवण्णा याला बंगळुरुतल्या न्यायालयानं येत्या २४ तारखेपर्यंत न्यायालयीन कोठडी दिली आहे. या प्रकरणी विशेष तपास पथकानं त्याला ३० मे रोजी अटक केली होती. न्यायालयानं त्याला ६ जूनपर्यंत पोलीस कोठडी दिली होती. ती नंतर १० जूनपर्यंत वाढवली. ती आज संपल्यामुळे त्याला न्यायालयात हजर करण्यात आलं. विशेष तपास पथकानं आणखी कोठडी मागितली नाही. त्यामुळे त्याला न्यायालयीन कोठडी देण्यात आली.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१० जून २०२४ - सोमवार

**<><><><><>**

मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांच्या अत्याधुनिक सुरक्षा ताफ्यावर आज काही अज्ञात सशस्त्र हल्लेखोरांनी हल्ला केला. हा ताफा जिरीबामला जात असताना इम्फाळ जिरिबाम मार्गावरच्या कांगपोकपी जिल्ह्यातल्या कोटलेन सिनम गावाजवळ हा हल्ला झाला. पण या ताफ्यात मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांचा समावेश नव्हता. या हल्ल्यात एक पोलीस कर्मचारी जखमी झाला असून त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केलं आहे.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज दक्षिण आफ्रिका आणि बांग्लादेश यांच्यातला सामना न्युयॉर्कमधे नासॉ कौंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर सुरु आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या २ षटकात १ बाद १८ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

मुंबई क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष अमोल काळे यांचं आज अमेरिकेत हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. ते ४७ वर्षांचे होते. उद्योजक असलेले अमोल काळे यांनी २०२२ मधे मुंबई क्रिकेट संघटनेच्या निवडणुकीत माजी क्रिकेटपटू संदीप पाटील यांना पराभूत करत अध्यक्षपद पटकावलं होतं. टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत काल भारत आणि पाकिस्तान यांच्यातला सामना पाहण्यासाठी ते अमेरिकेला गेले होते.

**//<><><><><>//**